# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १८/०८/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील सिल्लेवाडा येथे दिनांक १७/०८/२०२२ चे १३.१० वा. ते १३.५० वा. सुमारास निळ्या रंगाच्या बिना नंबरच्या न्यु हॉलर्ड कंपणीच्या मॉडल नं ४५१० ट्रैक्टर व लाल रंगाची ट्राली नं एमएच– ४०/एल– ४४०९ चा चालक आरोपी नामे– मंजु शंभु मुर्ती, वय ३५ वर्ष, रा. वार्ड नं. ४, खापरखेडा याने त्याच्या ताब्यातील वाहनात विना परवाना अवैधरित्या १ ब्रास रेती किं. ४,०००/– रू. भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण ३,७४,०००/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोउपनी श्री प्रितम निमगडे पोस्टे खापरखेडा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार ठाकरे मो.क्र. ८९९९९१७११२ हे करीत आहे.

### फसवणुक

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत सायबर सेल सावनेर येथे दिनांक ०४/०८/२०२२ चे १४.१० वा. दरम्यान अज्ञात आरोपीने त्याच्या मोबाईल वरून फिर्यादी नामे– शुध्दोधन गंगारामजी बागडे, रा. परसोडी वकिल पोस्ट कळमेश्वर सावनेर यास त्यांचे क्रेडीट कार्ड एक्सपायर झाल्याने रिन्युव्ह करायचे असल्यास ९.९९ रू चार्जेस भरावे लागतील असे सांगितले. त्यावरून फिर्यादीने मोबाईल फोनद्वारे होकार दिला असता ओटीपी क्र आल्याने तो सदर आरोपीस दिल्यानंतर क्रमाक्रमाने फिर्यादीचे क्रडीट खात्यातील १,००,८१४.७५/–रू. चे ऑनलाईन द्वारे वळते करून ऑनलाईन फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६(डी) माहिती तंत्रज्ञान अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री मुळुक मो.क्र ९५५२५६४०४७१ हे करीत आहे.

### जबर दुखापत

**पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा चंदणपारडी येथे दिनांक १६/०८/२०२२ चे १८.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे– नरेन्द्र पुरूशोत्तम रबडे, वय ४० वर्ष, रा. चंदणपारडी ता. काटोल जि. नागपुर व आरोपी नामे– सुरेन्द्र पुरूषोत्तम रबडे, वय ३५ वर्ष, रा. चंदनपारडी ता. काटोल जि. नागपुर हे सख्खे भाउ असुन त्यांच्या जागेच्या कारणावरून वाद आहे. दि १६/०८/२२ रोजी फिर्यादी हा त्याच्या घरी गेला असता त्याचा भाउ आरोपी हा सुध्दा त्या ठिकाणी आला. त्यादरम्यान त्यांच्यात वाद झाल्याने फिर्यादा हा त्याची एमएच– ४०/ए.ई– ७६४६ क्रमांकाची मोटरसायकल घेवुन तेथुन निघाला असता त्याच्या मागे त्याचा भाउ आरोपी नामे सुरेन्द्र हा सुध्दा त्याची एम एच– ४०/सीडी– ४१२७ क्रमाकाची पिकअप घेवुन निघाला व फिर्यादी यास जखमी करण्याचे उद्देशाने आरोपीने त्याच्या ताब्यातील पिकअप ही बेदरकारपणे चालवुन फिर्यादी याचे मोटरसायकला मागुन कट मारून जखमी केले व मोटरसायकलचे सुध्दा नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम २७९, ३२६, ४२७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री ढगे मो.नं. ९५१८९७९४९९ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. मौदा –** दिनांक १७/०८/२०२२ चे ११.३० वा. चे सुमारास पो.स्टे. मौदा हद्दीत फिर्यादीची मुलगी वय १७ वर्ष १० महिने हि आपले आजी सोबत सेंट्रल बॅक ऑफ इंडीया, मौदा येथे निराधार योजनेचे पैसे काढण्या करिता गेली होती. फिर्यादीची आई हि बॅकेतून पैसे काढत होती तेव्हा फिर्यादीची आई हिला फिर्यादीची मुलगी ही दिसली नाही. तेव्हा फिर्यादीचे आईने आजुबाजुला शोध घेतला मिळून आली नाही. त्यानंतर फिर्यादीची आई घरी आली व फिर्यादीला सदर हकिकत सांगितली तेव्हा फिर्यादीने सुध्दा तिचे मुलीचा शोध घेतला परंतू मिळून आली नाही. फिर्यादीयांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री प्रमोद चौधरी मो.क्र. ९८२३२१७२०५ हे करीत आहे.

## सर्पदंशामुळे मृत्यु

**पो.स्टे. कन्हान :–** अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील केरडी येथे दि. ०७/०८/२०२२ चे १३.०० वा. सुमारास **सौ निलाबाई गडुराव तायवडे (मृतक), वय ६५ वर्ष, रा. केरडी** हि शेतात करीत असतांना अचानक सापाने चावा घेतला. त्यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल नागपूर येथे नेले असता मरण पावली.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार नझरी कुरेशी मेयो पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार गणेश पाल मो.नं. ९५५२५१७२६८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**